# चला हाताळूया
# भौमितिक आकार




**गोळा करूया :** काडेपेटी, टूथपेस्टचे खोके, मिठाईचे खोके, पाण्याच्या बाटल्या विविध आकाराचे चेंडू, कार्डपेपरची केलेली विदूषकाची टोपी, कार्डपेपरची नळकांडी.

टेबलावरील सारख्या आकाराच्या वस्तूंचे गट कर.

**इष्टिकाचिती :**

मिठाईचे खोके उचलून हाताळा. अशा आकाराला इष्टिकाचिती म्हणतात.




इष्टिका म्हणजे वीट. तुम्ही विटा पाहिल्या असतील. विटेसारख्या आकाराला इष्टिकाचिती म्हणतात.

या इष्टिकाचितीला किती कडा आहेत, किती कोपरे आहेत पाहूया बरं.

इष्टिकाचितीला कडा– ☐ कोपरे – ☐

**आता चला इष्टिकाचितीचा पृष्ठभाग पाहूया ....**

तो कसा सपाट आहे पाहा. त्याला एकूण सहा पृष्ठे आहेत. या इष्टिकाचितीचा पृष्ठभाग सपाट आहे, म्हणून इष्टिकाचिती घसगुंडीवर ठेवली तर ती घसरत खाली येईल.


**शोध बरं**

टेबलावरील इष्टिकाचिती आकाराच्या वस्तू

**शंकू :**




आता पाहूया तू केलेली विदूषकाची टोपी. ही टोपी शंकूच्या आकाराची आहे.



आईस्क्रीमचा कोन, मेंदीचा कोन, विदूषकाची टोपी यांसारख्या आकारांना शंकू म्हणतात.


शंकूला एक कड आणि एक कोपरा आहे.
शंकूचा सपाट तळ वर्तुळाकार आहे. उभा तिरका पृष्ठभाग कसा वळत जातो पाहा. तो वळणारा पृष्ठभाग म्हणजे वक्रपृष्ठभाग.

**दंडगोल :**




**आता पाहूया ही पाण्याची बाटली.**

या पाण्याच्या बाटलीच्या आकाराला दंडगोल म्हणतात.



वाटोळा तळ असलेल्या डब्यासारख्या आकाराला दंडगोल किंवा वृत्तचिती म्हणतात.

या दंडगोलाला कडा दोन आहेत पण एकही कोपरा नाही.
दंडगोलाच्या तळाचा आणि वरचा पृष्ठभाग सारखा, सपाट आणि वर्तुळाकार आहे, तर मधला वळलेला पृष्ठभाग वक्रपृष्ठभाग आहे.




**करून बघ.**

घसरगुंडीवर दंडगोल ठेवल्यास तो घसरतो का घरंगळतो.

**घसरगुंडीवर वस्तूचा सपाट पृष्ठभाग ठेवल्यास ती वस्तू घसरते व वक्रपृष्ठभाग ठेवल्यास ती वस्तू घरंगळते, हे दंडगोलाच्या मदतीने छान समजेल.**

## गोल :

चेंडू गोल असतो हे तुम्हांला माहीत आहे. 



चेंडूसारख्या आकाराला गोल म्हणतात.

या गोलाला कडही नाही आणि कोपराही नाही.

गोलाचा पृष्ठभाग कुठेच सपाट नाही, तो सतत वळत जातो, म्हणून गोलाला फक्त वक्रपृष्ठभाग आहे.


**करून बघ.**

घसरगुंडीवर गोल ठेवल्यास तो घसरतो का घरंगळतो.



*** जोड्या जुळव.**

| आकार | आकाराचे नाव |
|---|---|
| १)  | १) दंडगोल |
| २)  | २) इष्टिकाचिती |
| ३)  | ३) शंकू |
| ४)  | ४) गोल |


*** खालीलपैकी कोणत्या वस्तू घरंगळतील आणि कोणत्या वस्तू घसरतील ते सांग.**


   

* खाली दाखवलेल्या वस्तू हाताळ. प्रत्येक वस्तूला किती कडा व किती कोपरे आहेत ते तपास व लिही.

|  |  |  |  |
|---|---|---|---|
| कडा – ☐<br>कोपरे – ☐ | कडा – ☐<br>कोपरे – ☐ | कडा – ☐<br>कोपरे – ☐ | कडा – ☐<br>कोपरे – ☐ |

* चित्रातील कोणत्या वस्तू घसरतील, कोणत्या घरंगळतील हे सांग.





**शिक्षक सूचना**

घनाकृती आकाराच्या अनेक वस्तू विद्यार्थ्यांसमोर ठेवाव्यात. त्यांना भौमितिक आकाराची नावे ओळखण्यास सांगावे. त्या वस्तूंच्या कडा व कोपरे मोजण्यास सांगावे.



**ICT Tools**

'पेंट–ब्रश' मध्ये जाऊन पेन्सिलच्या साहाय्याने वेगेवेगळे भौमितिक आकार काढ आणि ते रंगव.

DQSCCX